दैनिक सागर रायगड Raigad
@dainiksagar | for news: news@dailysagar.com | for ads: advt@dailysagar.com
१० रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, मुंबईसह पाच स्वतंत्र आवृत्त्या @dainiksagarnews
बु..ार दिनांक १३-३-२०१९ I RNI Regi. No. MAHMAR/2008/24817 I Postal Regi. No. RTR/006/2018-20 I किंमत ₹ ५/-



कृषि विज्ञान केंद्र रोहा मार्फत पोषण आहाराविषयी जागरूकता व शेतीपूरक व्यवसाय या विषयावर आदिवासी महिला शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता याप्रसंगीचे छायाचित्र.

# आदिवासी उपयोजनांतर्गत आदिवासी महिला शेतकरी मेळावा संपन्न

**रोहे :-** कृषि विज्ञान केंद्र, किल्ला-रोहा मार्फत पोषण आहाराविषयी जागरूकता व शेतीपूरक व्यवसाय या विषयावर आदिवासी महिला शेतकरी मेळावा, ११ मार्च २०१९ रोजी मढाली बु., ता.रोहा येथील आदिवासीवाडीवर आयोजित करण्यात आला. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी डोलवहाळचे माजी सरपंच चंदर भिकू कोळी, प्रमुख अतिथी मार्गदर्शक कु.शिल्पा शिरवाडकर, सीएम फेलो, राबगाव, ता.पाली या होत्या. तर मार्गदर्शक तज्ज्ञ म्हणून डॉ.प्रमोद मांडवकर, जीवन आरेकर, माधव गीत्ते उपस्थित होते.

या मेळाव्याच्या सत्रात मार्गदर्शन करताना जीवन आरेकर, विषय विशेषज्ञ (वनस्पती रोगशास्त्र) यांनी पोषण आहार विषयी शेतकरी महिलांचे आरोग्य, विद्यार्थ्यांचे शिक्षण तसेच तरूणांचा शेतीमधील सहभाग याविषयी मार्गदर्शन केले. माधव गीते, यांनी मत्स्य शेतीविषयी माहिती दिली व मूल्यवर्धन विषयी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेण्याचे आवाहन केले.

विशेष अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना शिल्पा शिरवाडकर यांनी आदिवासींकरिता असलेल्या शासन योजनांची माहिती दिली. माजी सरपंच चंदर कोळी व विद्यमान सरपंच विश्वनाथ धामणसे यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रमोद मांडवकर तर आभार प्रदर्शन सुप्रिय झोलगे यांनी केले.